
# ९ पालक व शाळा सहयोग

**प्रतिबिंब / दर्पण**

- तुम्हाला तुमच्या शाळेतील पालकसभा आठवते का?
- तुमचा काय अनुभव आहे? थोडक्यात लिहा.

## पालक, शिक्षक सहयोग बांधणी



चित्र ९.१

**कृती**

**खेळ खेळा – चक्र फिरवणे**

**खेळासाठीची तयारी**




- खेळ खेळण्याची पद्धत
- वर्गाची दोन गटात विभागणी करा.
- दोन गटासाठी दोन प्रमुख ठरवा.
- प्रत्येक गटातून एक बालक संगीत/टाळ्या वाजवण्यासाठी निवडा.
- दोन गट प्रमुखांमध्ये 'पासिंग द पार्सल' (Passing the parcel game) हा खेळ खेळायला सुरुवात करा.
- विरुद्ध गटातील एक बालक पुढे येईल. वर्गाकडे पाठ करून ते टाळ्या/संगीत वाजवायला सुरुवात करेल.
- २-३ मिनिटांनी संगीत थांबवावे.
- ज्या गटाकडे पार्सल (parcel) आहे तो गट उत्तर देईल.


- शिक्षक चक्र फिरवतील.
- चक्र थांबल्यानंतर ज्या गटाकडे पार्सल (parcel) आहे तो गट बाणासमोर जो शब्द आला असेल त्याप्रमाणे उत्तर देईल. शब्द पाहिल्यावर काय आठवते हे गटाने स्पष्ट करायचे आहे.

पालकांचा सहभाग (Parental involvement) हा बालकाच्या समग्र विकासामध्ये (holistic development) मोजमाप करता येण्याजोगा बदल घडवतो. आपल्याला माहित आहेच की, पालक हे बालकांचे पहिले शिक्षक असतात. जेव्हा शाळा पालक-बालक संबंधाविषयी मूल्य व आदर दाखवते आणि बालकाच्या शिक्षणात बरोबरीचा भागीदार म्हणून पालकांचे स्वागत करते अशावेळी पालक व शिक्षकांना मुलांचे सकारात्मक आणि परिपूर्ण आयुष्य घडवण्यासाठी मिळालेली संधी असते.

शाळा व कुटुंब यामध्ये घट्ट सहसंबंध असतील तर बालक तसेच पालक दोघांनाही त्याचा खूप फायदा झालेला दिसतो. हे सिद्ध झाले आहे की बालकांच्या शालेय प्रगतीमध्ये पालकांचा सहभाग असल्यास मुले जास्त चांगली प्रगती करून ध्येय साध्य करू शकतात. तसेच पालकांचे जर शाळेतील शिक्षकांबरोबर सकारात्मक संबंध असतील तर, बालकांबद्दलच्या काही चिंता/समस्या असतील तर त्यांची उकल लवकर होऊ शकते. आपल्या बालकांना चांगले शिक्षण मिळाले आहे याविषयी पालकांची खात्री पटते आणि सहसंबंधाबरोबरच शाळेबद्दल विश्वास आणि आदरही विकसित होतो.

### ९.१ पालक - शाळा सहयोगाचे महत्त्व आणि गरज (Importance and Need of Parent School collaboration)

शालेय पातळीवर पालकांचा सहभाग हा घटक पालक - शाळा सहसंबंधात खूप मदत करतो. शाळा व घर यांच्यातील संबंध आणि सहयोग निर्माण होण्यासाठी मूर्त स्वरुपातील प्रयत्नांची गरज असते.




चित्र ९.२

या सर्व प्रक्रियेत शाळा आणि घर यांच्या सहयोगाला महत्त्व /ओळख मिळण्याची गरज असते. शाळा व घर या दोन्ही ठिकाणच्या प्रसंगाचा शैक्षणिक निष्पत्तीवर परिणाम होतो. शाळा व घर यांच्यातील भागीदारीचा परिणाम बालकांच्या वर्गातील वर्तनावर होतो.

बालकांना शिक्षण देण्यामध्ये शाळा व घर या दोन स्वतंत्र प्रणाली, त्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या निभावत असतात. शाळा - घर यांच्या यशस्वी सहयोगासाठी पालक व शिक्षकांनी प्रक्रियेमध्ये अडथळा आणणारे सर्व घटक काढून टाकावे. आर्थिक-सामाजिक दर्जा, घरातील संघर्षमय वातावरण, सांस्कृतिक फरक, पालकांचे शिक्षण असे काही घटक अडथळे आणतात.

पालक-शिक्षकांमधील निरोगी संबंधाचे महत्त्व का आहे? बालकांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये सुधारणा दिसणे, सामाजिक क्षमता विकसित होणे आणि भावनिक स्वास्थात सुधारणा होणे हे पालक-शिक्षकांमधील सकारात्मक

संबंधामुळे घडते असे दिसून आले आहे. पालक-शिक्षक जेव्हा एकमेकांचे भागीदार म्हणून काम करतात तेव्हा बालके शाळा व घर या दोन्हीही ठिकाणी प्रगती दर्शवतात.

## ९.१ (अ) घर व शाळा यांच्यातील जवळकीच्या संबंधाची गरज (Need for a close relationship between home and school)

- संवाद साधण्यासाठी (To communicate)

  शाळा व घर यांच्यातील संबंध नियमित, द्विमार्गी व अर्थपूर्ण असावा.

- पालकत्वाची कौशल्ये विकसित करणे (To develop parenting skills)

  पालकत्वाच्या कौशल्यांना चालना द्यावी व पाठिंबा द्यावा.

- अध्ययन प्रक्रिया समृद्ध करणे (To enhance learning process)

  बालकांच्या अध्ययन मूल्यमापन प्रक्रियेत पालकांची भूमिका खूप महत्त्वाची असते.

- पालक सहभागाला प्रोत्साहन देणे (To promote parent's involvement)

  शाळेच्या उपक्रमात पालकांच्या उत्स्फूर्त सहभागाचे स्वागत करावे.

- निर्णय घेण्यात भागीदारी असणे (To become a partner in decision making)

  निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत पालक भागीदारी करू शकतात.

- समाजाबरोबर सहयोग असणे (To collaborate with the community)

  शाळेचे प्रबलीकरण, कुटुंब आणि बालकांचे अध्ययन यासाठी समाजातील साधनांचा वापर करणे.

### गरजांमागील मूलभूत तत्त्वे (Basic principles behind these needs)

- बालकांचे उत्तम शिक्षण आणि चांगल्या जीवनाची सुरुवात करण्यासाठी शाळा आणि घर यांनी जबाबदारी विभागून घ्यावी.
- काही समस्या निर्माण होण्यापूर्वी शाळांनी कुटुंबाचा समावेश करून मदत घ्यावी.
- निर्णय प्रक्रियेत शाळा कुटुंबांना समाविष्ट करून घेईल.
- शाळा बालकांसाठी, अर्थपूर्ण अनुभवांचे आयोजन करेल.
- कुटुंब बालकांच्या हजेरीवर लक्ष ठेवेल.
- साक्षरतेच्या अनुभवामध्ये कुटुंब गुंतलेली राहतील.
- शाळेतील शिक्षक व इतर घटकांबरोबर कुटुंबे रुळतील.
- निर्णय प्रक्रियेमध्ये कुटुंबे सहभागी होतील.
- शाळा व घर यात परिणामकारक द्विमार्गी संवाद घडेल.
- बालकांना कशी मदत करावी हे शिकण्याची कुटुंबांना संधी मिळेल.

शाळा व घर यांच्यातील संबंध ही नुसती एक कृती नसून तो एक दृष्टीकोन आहे. ज्यामध्ये पालक व शिक्षक यांनी सारखीच ध्येय समोर ठेवलेली असतात आणि दोघेही प्रक्रियेमध्ये योगदान देतील. यशस्वी सहयोग निर्माण होण्यासाठी परिणामकारक संवादाची आवश्यकता असते.

शाळा व घर यांच्यातील यशस्वी संबंधाच्या पायऱ्या असतात.

### (१) ओळख (Introduction)

- सकारात्मक संबंध प्रस्थापित करणे.
- केंद्रीत वर्तन - ध्येय, उद्दिष्टे
- समस्यांवर लक्ष केंद्रीत करणे.

## (२) तादात्मीकरण (Identification)

- असलेल्या समस्यांचे वैयक्तिक संवेदन
- ध्येयामधील साधर्म्य शोधणे.
- अपेक्षित निष्पत्ती.

## (३) उत्तर शोधणे (Solution)

- ध्येयप्रेरित वर्तन.
- अपेक्षित निष्पत्तीसाठी स्रोत शोधणे.

## (४) अंमलबजावणी (Implementation)


- ध्येय कशी ठरवली जातात.
- ध्येयपूर्ती – ध्येयाच्या दिशेने वर्तन व कृती
- शोधलेल्या उत्तरांवर चर्चा, ध्येयपूर्ती झालेली नसल्यास एकमेकांना दोष न देता ध्येयांमध्ये सुधारणा व बदल करणे.
- पालकांबद्दल आत्मीयतेची भावना पुन्हा एकदा निर्माण करणे.
- शिक्षकांच्या वर्तनाकडे पालक आधार देणारे व काळजी घेणारे वर्तन या दृष्टीकोनातून बघतात.
- शाळा व घर यांच्यात चांगले संबंध व चांगला संवाद प्रस्थापित होण्यास मदत होते.
- बालकांच्या गरजांची पूर्तता होण्याची वचनबद्धता निर्माण होते.
- बालकांना पाठिंबा दिला जातो व आत्मविश्वास विकसित होण्यास मदत केली जाते.
- एकमेकांना सकारात्मक संदेशांची देवाण-घेवाण केली जाते.
- चिरंतन टिकणारे सहसंबंध निर्माण होतात.
- शाळा व घर सहसंबंध बालकांना ज्ञान, कौशल्य आणि दृष्टीकोन पुरवतात.
- शिक्षणासाठी समान संधी पुरवल्या जातात.




चित्र ९.३

## ९.१ (ब) महत्त्व (Importance)

- शाळा व घर यांच्या सहयोगामुळे प्रौढ व बालक यांच्यात सकारात्मक सहसंबंध निर्माण होतात.
- जवळकीच्या संबंधातून शारीरिक व मानसिक सुरक्षितता पुरवली जाते.
- बांधीलकीची भावना निर्माण होते.




चित्र ९.४

**Evans (1971)**

'Parental involvement refers to some degree of participation at all major stages of an early education programme : Planning, execution, evaluation and modification.'

**इव्हान्स् (Evans) १९७१**

पूर्वमाध्यमिक अभ्यास कार्यक्रमात : नियोजन, संयोजन, मूल्यमापन आणि बदल किंवा सुधारणे या महत्त्वाच्या पायऱ्या मध्ये काही प्रमाणात सहभागी होणे म्हणजे 'पालक सहभाग' (Parental involvement) होय.

## ९.२ पालक – शाळा सहयोगाच्या पद्धती (Methods of Parent School collaboration)

आजच्या काळातील कुटुंबाची जीवनशैली पालकांच्या पारंपारिक भूमिका बदलण्यास किंवा सुधारण्यास भाग पाडतात. पालक कामासाठी घराबाहेर पडतात. बालके खूप वेळासाठी घरामध्ये राहात नाहीत. बरीच बालके बालसंगोपन केंद्रातील शिक्षक व संगोपनकर्ते यांच्याबरोबर विभागली जाते.

आजच्या काळातील बालकांच्या स्थितीला पालक व शिक्षक दोघेही तितकेच कारणीभूत असतात. त्यांच्या भूमिकाही समान असतात. त्यामुळे त्यांनी एकत्र काम केले पाहिजे. म्हणजेच पालकांचा सहभाग कधीच संपत नाही. उलट पालक व शिक्षकांनी एकत्र काम केल्यामुळे बालकांमध्ये अनपेक्षित बदल दिसून येतात. पालक शिक्षकांकडून बालकांची योग्य हाताळणी शिकू शकतात.

कोणताही शैक्षणिक कार्यक्रम किंवा बालसंगोपन कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आजच्या काळात पालकांची बालकांमधील गुंतवणूक आणि बालकांबरोबर आंतरक्रिया होणे आवश्यक आहे.

### पालक सहभागाची संकल्पना (Concept of Parent involvement)

'पालक सहभाग' म्हणजे काय? हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बालकांसाठी चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही केंद्रातील खूप गोष्टी ऐकणे ते निर्णय घेणे या सर्वामध्ये पालकांचा सहभाग असतो.

### पालक व शाळा सहयोगाचे फायदे (Advantages of Parent School collaboration)

- पालक व शिक्षक यांच्यात जवळीकता निर्माण होते.
- पालकांकडून शिक्षकांना प्रत्यक्ष मदत मिळते.
- पालक स्त्रोत किंवा मदतनीस म्हणून मदत करू शकतात.
- पालकांपासून पालकांपर्यंत असा कार्यक्रम घेऊ शकतो, ज्यामुळे ते एकमेकांना माहिती देऊ शकतात.
- पालक जर केंद्रातील सभामध्ये तज्ञांनी घेतलेल्या सभांमुळे पालकांना फायदा होतो.
- घर आणि केंद्र यांच्यामध्ये पालक दुवा ठरू शकतात.
- संगोपन आणि हाताळणीसाठी शिक्षक ज्या पद्धतींचा वापर करतात ते घरी वापरल्यास पालकांना फायदा होतो.
- पालकांचा अर्थपूर्ण सहभाग मुलांच्या विकासात नक्कीच महत्त्वाचे योगदान ठरते.
- बालकांमध्ये आत्मविश्वास वाढवण्यास पालकांच्या सहभागाची मदत करतो.
- बालकांमध्ये कौशल्य विकसित करण्यास मदत होते.

### (१) केंद्रातील सभा (Meetings in the centre)

केंद्रामध्ये सभा आयोजित केल्यास पालकांचा सहभाग हा त्या सभेसाठी महत्त्वाचा असतो.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- पालक हे उत्साही श्रोता असावेत.
- पालक शिक्षकांना आळीपाळीने सभांचे आयोजन करण्यासाठी मदत करू शकतात.
- पालक तज्ञ व्यक्तींबरोबर संवाद साधण्यास, पाहुण्यांना आमंत्रण देणे यात मदत करू शकतात.
- तज्ञ व्यक्ती जिथे राहतात तेथून त्यांना घेऊन येणे आणि नेऊन सोडणे यात पालक मदत करू शकतात.
- सभेत चहा आणि अल्पोपहार देण्याची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी पालक घेऊ शकतात.
- सभेत होणाऱ्या चर्चासत्रात पालक नेतृत्व करू शकतात.
- स्वतःच्या कल्पना सांगणे आणि सहभागी असणे यात पालक नेतृत्व करू शकतात.
- दैनंदिन जीवनात बालकांच्या संदर्भात येणाऱ्या समस्या सोडवण्याविषयीचे मार्ग एकमेकांना सांगू शकतात.
- सभेदरम्यान पालक शिक्षकांना त्यांच्या गरजा सांगू शकतात.

## (२) स्नेहसंमेलन (Gatherings)

स्नेहसंमेलन हे बालकांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम असतो. बहुतेक सर्व मुले स्नेहसंमेलनाच्या काळात उत्साही असतात.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- मुलांकडे लक्ष ठेवण्यासाठी पालक मदत करू शकतात.
- सजावट करण्यासाठी पालक जबाबदारी घेऊ शकतात.
- प्रेक्षक वर्गाची व्यवस्था पाहण्यास मदतनीस म्हणून पालक काम करू शकतात.
- कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यास पालक मदत करू शकतात.
- बालकांकडून कार्यक्रमाचा सराव करून घेण्यास पालक मदत करू शकतात.
- कार्यक्रमादरम्यान मुलांना खाऊ देण्याचे काम काही पालक करू शकतात.
- बालकांची ने–आण करण्यासाठी पालक स्वतःची वाहने पुरवू शकतात.
- पालक स्नेहसंमेलनात सहभागी होऊन बालकांसाठी कार्यक्रमाचे सादरीकरण करू शकतात.
- बालकांची रंगभूषा आणि वेषभूषेची जबाबदारी पालक घेऊ शकतात.

## (३) सण साजरे करणे (Festival celebration)

भारतात साजरे होणारे बहुतेक सर्व प्रकारचे सण केंद्रात साजरे केले जावे. केंद्रामध्ये वेगवेगळ्या सामाजिक गटातील मुले असतात. केंद्रात सण साजरे करण्यामागील मुख्य उद्देश भारतातील विविध संस्कृतींची बालकांना जाणीव करून देणे हा आहे.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- सजावट करू शकतात.
- सण साजरे करण्यासाठी लागणारे साहित्य पुरवू शकतात.
- वेगवेगळ्या सामाजिक गटातील पालक विशिष्ट सणांमध्ये सहभागी होऊ शकतात.
- पालक येऊन सणांविषयी माहिती देऊ शकतात.
- विशिष्ट गटात विशिष्ट सण कशाप्रकारे साजरा केला जातो त्याविषयी चित्र, फोटोग्राफ्स, सिडी आणून बालकांना दाखवू शकतात.

- बालके सण साजरे करतांना पारंपरिक पोषाख घालू शकतात. त्या विशिष्ट पोषाखासाठी पालक मदत करू शकतात.
- मुख्यतः एकमेकांना भेटण्यासाठी, शुभेच्छा देण्यासाठी आणि आनंदासाठी सण साजरे केले जातात. पालक येऊन सणांची प्रथा शिकवू शकतात.
- विशिष्ट सणांसाठी असणारे विशिष्ट पदार्थ पालक बालकांना देऊ शकतात.

### (४) सहल (Picnic)

सहल मुख्यतः दोन उद्देशांनी आयोजित केली जाते – मजा आणि शिक्षण. बालके सहलीसाठी जेव्हा केंद्राबाहेर जातात तेव्हा त्यांना असुरक्षित वाटू शकते. अशा वेळी त्यांना मदतीची गरज असते. मात्र शिक्षिका एका वेळी सगळ्या वयोगटातील बालकांकडे लक्ष देऊ शकत नाही. अशावेळी पालक मदत करू शकतात.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- पालक सहलीसाठी स्थळ किंवा जागा सुचवू शकतात.
- सहलीला जाण्यासाठी वाहने पुरवू शकतात.
- सहलीसाठी लागणारे खाद्यपदार्थ पुरवू शकतात.
- बालकांची व्यवस्था पाहण्यासाठी केंद्रावर जाऊ शकतात.
- जर केंद्राला आवश्यकता वाटत असेल तर सहलीसाठी काही आर्थिक सहाय्य करू शकतात.
- सहलीच्या ठिकाणी बालकांसाठी काही मनोरंजनाच्या कृती घेऊन बालकांचे सहलीचे क्षण आनंददायी बनवू शकतात.

### (५) प्रदर्शन (Exhibitions)

पालकांच्या शिक्षणासाठी किंवा काही वेळा बालकांसाठी प्रदर्शन आयोजित केली जातात. अशा वेळी पालक प्रदर्शनाचे नियोजन आणि प्रदर्शनात स्पष्टीकरण देण्याची मदत नक्की करू शकतात. प्रदर्शनाची मांडणी करणे आणि प्रदर्शन संपल्यावर आवरणे हे खूप दमवणारे काम असते.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- प्रदर्शनाच्या जागेची सजावट करणे.
- प्रदर्शनाला लागणाऱ्या साहित्याची निर्मिती करणे.
- तक्ते तयार करणे.
- प्रदर्शनाची मांडणी व रचना करणे.
- प्रदर्शनासाठी जागेची सोय करणे.
- तक्त्यांचे स्पष्टीकरण देणे.
- प्रदर्शनासाठी प्रारुप तयार करणे.
- प्रदर्शनासाठी आमंत्रणपत्र तयार करणे.
- प्रदर्शनासाठी आवश्यक तो पत्रव्यवहार करणे.

### (६) स्पर्धा (Competitions)

खूप लहान बालकांसाठी केंद्रामध्ये स्पर्धा आयोजित केल्या जाऊ नयेत. पण मोठ्या बालकांसाठी आयोजित केल्या जाऊ शकतात. लहान बालकांसाठी मनोरंजनात्मक कृती असाव्यात.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून येऊ शकतात.
- बक्षिसांसाठी प्रायोजक म्हणून मदत करू शकतात.
- प्रत्यक्ष स्पर्धेच्यावेळी पालक शिक्षकांना मदत करू शकतात.
- स्पर्धेच्या वेळी मिठाई किंवा खाऊ पुरवू शकतात.

### (७) बालमेळावा (Balmela)

बालमेळावा ही पण बालकांसाठी मनोरंजनात्मक कृती आहे. इथे बालके आयोजित केलेले खेळ आणि कृतींचा मोकळेपणी आनंद घेऊ शकतात. इथे कृतींसाठी

कोणतीही ठराविक अशी चौकट नसते. याचे आयोजन कसे करावे हे पूर्णपणे शिक्षिकेच्या सर्जनशीलतेवर अवलंबून असते.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- बालमेळाव्यासाठी पालक शिक्षकांना कल्पना सुचवू शकतात.
- विविध स्टॉल्स्वर मदत करू शकतात.
- बालकांची व्यवस्था पाहणे व त्यांच्याकडे लक्ष ठेवणे.
- खाद्यपदार्थांचे स्टॉल ठेवू शकतात.
- गोष्ट सांगणे, बाहुलीनाट्य अशा संवाद स्टॉल्सवर तज्ज्ञ व्यक्ती म्हणून काम करू शकतात.
- बालकांसाठी शारीरिक कृती, खेळ यांचे आयोजन करू शकतात.

### (८) बाहुलीनाट्य / गोष्ट सांगणे (Puppet show/ Story telling)


बाहुलीनाट्य हे गोष्ट सांगण्याचे तंत्र आणि कौशल्य आहे. ज्यामुळे बालके गुंग होऊ शकतात. बाहुलीनाट्याद्वारे मनोरंजनात्मकरित्या शिक्षणही दिले जाऊ शकते.

**पालक कशाप्रकारे सहभागी होऊ शकतात (How parents can get involved) :**

- पालक तज्ज्ञ व्यक्ती म्हणून काम करू शकतात.
- पालक नाट्याचे लेखन करू शकतात.
- बाहुल्या तयार करणे व त्याचा वापर करणे यासाठी बालकांची कार्यशाळा घेऊ शकतात.
- केंद्रातील मोठ्या बालकांना बाहुल्या करणे आणि त्याचा वापर करायला शिकवू शकतात.
- बाहुलीनाट्यासाठी गोष्टी सुचवू शकतात आणि बालकांच्या गरजांनुसार नवीन गोष्टी लिहू शकतात.

**मुद्द्यांची उजळणी करा.**

**पालक – शाळा सहयोग**



**शब्दसूची *Glossary***

**सहयोग (Collaboration) :** ध्येयपूर्ती किंवा उद्‌दिष्ट साध्य करण्यासाठी दोन किंवा जास्त व्यक्ती किंवा संस्था एकत्रित काम करतात त्या प्रक्रियेला सहयोग म्हणतात.

**प्रभावी संभाषण (Effective communication) :** प्रभावी संभाषण म्हणजे दोन किंवा जास्त व्यक्तींमध्ये योग्य मार्गाने संदेश देणे, घेणे आणि समजून घेणे.

**पालकांचा सहभाग (Parent involvement) :** पालकांचा सहभाग म्हणजे बालकांच्या प्रत्यक्ष जीवनात आणि शालेय जीवनात पालक किती प्रमाणात सहभागी आहेत.

## स्वाध्याय

**प्र. १ जोड्या लावा.**

| अ | ब |
|---|---|
| (१) ध्येय कशी ठरवली जातात | (अ) तादात्मीकरण |
| (२) सकारात्मक संबंध प्रस्थापित करणे | (ब) उत्तर शोधणे |
| (३) ध्येयामधील साधर्म्य शोधणे | (क) अंमलबजावणी |
| (४) अपेक्षित निष्पत्तीसाठी स्त्रोत शोधणे | (ड) ओळख |

**प्र. २ टीपा लिहा.**

(१) केंद्रातील सभा

(२) स्नेहसंमेलन

(३) प्रदर्शन

(४) बालमेळावा

(५) स्पर्धा

**प्र. ३ खालील कृतींमधील पालक सहभागाविषयी लिहा.**

(१) सण साजरे करणे

(२) सहल

(३) स्पर्धा

(४) बाहुलीनाट्य

**प्र. ४ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) पालक - शाळा सहयोगाची गरज स्पष्ट करा.

(२) पालक - शाळा सहयोगाच्या गरजेमागची मूलभूत तत्त्वे लिहा.

(३) पालक - शाळा सहयोगाचे फायदे लिहा.

(४) पालक - शाळा सहयोगाचे महत्त्व लिहा.

(५) केंद्रातील पालक सभेत पालकांचा सहभाग कशाप्रकारे असू शकतो ?

**प्र. ५ रिकामे चौकोन पूर्ण करा.**

(१) गोष्ट सांगण्याचे तंत्र

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | हु | | | ट्य |

(२) बालकांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्ने | | सं | | | न |

(३) पालकांना शिक्षित करण्यासाठी आयोजित केले जाते.

| | | | |
|---|---|---|---|
| | द | | न |

## प्रकल्प / स्वयंअध्ययन

**पालकसभा आयोजित करा.**

**भाग – १**

- विषय : ..........................................................................................
- विषयतज्ज्ञ : ..........................................................................................
- दिनांक : ......................   दिवस / वार : ..........................
- वेळ : ......................
- स्थळ : ......................

**भाग – २**

**पुढील मुद्दे सविस्तर लिहा.**

- पालकांसाठी सूचनापत्र : ..........................................................................................
- विषयतज्ज्ञांसाठी आमंत्रण पत्रिका : ..........................................................................
- फर्निचर रचना व खोलीची रचना : ..........................................................................
- अल्पोपहाराची व्यवस्था : ..........................................................................................

❖ ❖ ❖